केंद्र शासनाचा माहिती अधिकार -२००५.  E- 3254460

नमुनापत्र- अ (पहा नियम)

प्रति,
जन माहिती अधिकारी,
फेरीवाला विभाग. / बाजार विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका.  H.A. Sawant

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

बाजार विभाग
आवक क्र. 18
दि. 25/11/2024

१)अर्जदाराचे नाव:- हेमंत अनंत सावंत.

२) अर्जदाराचा पत्ता : : शॉप नंबर २१ ओस्ट्वाल शॉपिंग सेंटर भाईंदर पूर्व

भ्रमणध्वनी : **9820080811**

३)आवश्यक असलेली माहिती :- मीरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील फेरीवाला बाबत संपूर्ण माहिती मिळावी.

४) माहितीशी संबंधित कालावधी: ०१-०१-२०१५ पासून आजपर्यंत.

५) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :- मीरा-भाईंदर शहरातील फेरीवाला क्षेत्र, ना फेरीवाला क्षेत्र, फेरीवाल्यांकडून पावती वसूल करण्याकरिता देण्यात आलेल्या ठेकाबाबत संपूर्ण माहिती माहिती अधिकारात मिळावी.

१) निविदा, ठेका ,करार बाबतमाहिती मिळावी.

२) अटी शर्ती भंग केले असल्यास त्याबाबत ठेकेदार यांना नोटीस, पत्र ,समजपत्र दिले असल्यास त्या बाबत माहिती मिळावी.

३) ना फेरीवाला क्षेत्र येथे ठेकेदार यांनी जबरन पावती वसूल केल्यास ठेकेदाराविरुद्ध गुन्हा नोंद केला असल्यास त्याबाबत माहिती मिळावी.

४) मिरा-भाईंदर शहरातील फेरीवाला क्षेत्र ,ना फेरीवाला क्षेत्र बाबत सविस्तर माहिती मिळावी.

५) करारा मधील अटी शर्ती भंग केल्यास, पालन न केल्यास गुन्हा नोंद करणे तसेच कारवाई करण्याचे अधिकार असलेले पद, अधिकाऱ्याचे नाव बाबत माहिती मिळावी.

६) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीस:- व्यक्तीस.

७) टपालाद्वारे असलेल्या बाबतीत:- शीघ्र.

८) त्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन:- न्यायालयीन कामकाज करणे करिता.

९) अर्जदार दारिद्र्यरेषेखाली आहे किंवा कसे:- नाही.

ठिकाण :- भाईंदर  दिनांक : ३०-१०-२०२४

अर्जदाराची सही.

H.A. Sawant

हेमंत अनंत सावंत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/ बाजार/13/2024-25 दि.29/ 11 /2024

प्रति,
**श्री. हेमंत अनंत सावंत,**
शॉप नं. 21, ओस्तवाल शॉपींग सेंटर,
भाईंदर (प.)

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

**विषय :- <u>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती मिळणे बाबत.</u>**

**संदर्भ :- आपला दि. 30-10-2024 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**
**(प्राप्त दि. 25-11-2024)**

उपरोक्त विषयान्वये या विभागाकडे माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला संदर्भिय अर्ज प्राप्त झालेला असुन त्यातील अपेक्षिलेली मुद्देनिहाय माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | माहिती |
|---|---|---|
| 1. | निविदा, ठेका, करार बाबत माहिती मिळावी. | सोबत माहिती जोडली आहे. (पृष्ठ क्र. 1 ते 15) |
| 2. | अटी शर्ती भंग केले असल्यास त्याबाबत ठेकेदार यांना नोटीस, पत्र, समजपत्र दिले असल्यास त्या बाबत माहिती मिळावी. | निरंक |
| 3. | ना फेरीवाला क्षेत्र येथे ठेकेदार यांनी जबरन पावती वसुल केल्यास ठेकेदाराविरूध्द गुन्हा नोंद केला असल्यास त्याबाबत माहिती मिळावी. | निरंक |
| 4. | मिरा-भाईंदर शहरातील फेरीवाला क्षेत्र, ना फेरीवाला क्षेत्र बाबत सविस्तर माहिती मिळावी. | सोबत माहिती जोडली आहे. (पृष्ठ क्र. 16 ते 19) |

E-2553394

# मिरा भाईदर महानगरपालिका

## बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

जा.क्र.मनपा/ बाजार/ 17 /2024-25 दि. 09 /08/2024

**//ई-ऑक्शन पध्दतीने फेर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत//**

1. खालील नमुद केलेल्या क्षेत्रातील बाजार लिलाव एकत्रित प्रक्रिया **E-Auction** पध्दतीने होणार आहे.
2. बाजार वसुली फी ठेक्याची मुदत 3 वर्षाच्या कालावधीकरीता राहील.
3. सदरचा जाहिर लिलाव ई-ऑक्शन पध्दतीने दि. 04-09-2024 रोजी करण्यात येणार आहे.
4. महानगरपालिकेने बाजार देकाराची किमान रक्कम खालील तक्यात दर्शविलेली असून लिलावाची वेळ दिलेली आहे.

| अ. क्र. | विभाग | लिलावाची वेळ | सन | देकाराची किमान रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी | ठेक्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मिरा-भाईंदर मनपा क्षेत्र | स.11.00 ते दु.1.30 | 2023-24 | 8,98,44,580/- | 16,35,171/- | रु.21000 GST सह | 36 महिने |
| | | | 2024-25 | 10,78,13,496/- | | | |
| | | | 2025-26 | 12,93,76,195/- | | | |
| | **एकूण** | - | - | **32,70,34,271/-** | **16,35,171/-** | **21,000/-** | |

| | |
|---|---|
| अ) | लिलावाच्या अटीशर्ती ज्या व्यक्तीस / संस्थेस मंजुर असतील तसेच ज्या व्यक्ती / संस्था लिलावाच्या अटीशर्तीची पुर्तता करीत असतील, त्यांनीच लिलावा मध्ये भाग घ्यावयाचा आहे. त्यांना दि. 12-08-2024 ते दि. 26-08-2024 रोजी सायं. 4.00 वाजेपर्यंत लिलावाच्या अटी शर्ती मनपाच्या संकेतस्थळ www.eauction.gov.in वर ऑनलाईन उपलब्ध राहतील. |
| ब) | बाजार लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/ संस्थेकडुन मनपाने मागणी केलेली आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्र दि. 12-08-2024 ते दि. 26-08-2024 साय. 4.00 वाजेपर्यंत ऑनलाईन स्विकारण्यात येतील. |
| क) | सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी दि. 28-08-2024 ते दि. 03-09-2024 सकाळी 10.00 ते साय. 4.00 वाजेपर्यंत करण्यात येईल व त्यानंतर मंजुरी बाबत निर्णय घेण्यात येईल. |
| ड) | फॉर्म फी, GST (18%) सहित व इसारा रक्कम RTGS व्दारे मनपाच्या अधिकृत बँक खात्यात भरणा केल्यानंतर अर्जदारास लिलावात भाग घेता येईल. |

| Sr. No | Bank Name | Branch name | A/C NO | MICR Code | IFSC Code |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Union Bank of India | Bhayander (w) | 392801010048795 | 400026071 | UBIN0839287 |
| 2 | State Bank of India | Bhayander (w) | 34399412917 | 400002112 | SBIN0005318 |

बँकेत रक्कम जमा केल्यानंतर प्राप्त UTR क्रमांक असलेली स्लीप कागदपत्रांच्या सोबत महानगरपालिकेत जमा करावी.

**(Envolep -1, (Technical Bid)**

| | |
|---|---|
| 1 | लिलावात भाग घेऊ इच्छिणारे ठेकेदार, व्यवसायधारक, व्यापारी संस्था यांनी फॉर्म फी रू. 21,000/- जी.एस.टी रक्कमेसह एकूण देकार रक्कमेच्या अर्धा टक्के इसारा रक्कम रू. 16,35,171/- (सोळा लाख पसत्तीस हजार एकशे एकाहत्तर मात्र) RTGS व्दारे मनपाच्या अधिकृत बँक खात्यात भरणा करणे अनिवार्य आहे.) |
| 2 | दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र. |
| 3 | बाजार लिलावात भाग घेण्यासाठी चालु वर्षाचे राष्ट्रीयकृत/शेड्युल बँकेची रु.1,00,00,000/- (रुपये एक कोटी मात्र) बँक सॉलव्हंसी सर्टीफिकेट जोडणे अनिवार्य आहे. |
| 4 | मागील 3 वर्षांचे income Tax Returns सादर केल्याची प्रत. |
| 5 | सनदी लेखापाल यांनी मागील तीन वर्षांचे रु.1 कोटी पेक्षा जास्त पॉझीटीव्ह नेटवर्थ असलेले प्रमाणपत्र प्रमाणित केलेले असावे. |
| 6 | वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र (GST Registration Certificate) व पॅनकार्डची प्रत (Pancard Copy) जोडणे अनिवार्य आहे. |
| 7 | बोलीदात्याने मिरा-भाईंदर मनपा क्षेत्रातील बाजार क्षेत्राची पाहणी केल्याबाबत मनपा उपायुक्त (बाजार) यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (सोबत दिलेल्या नमुन्यात) |
| 8 | सनदी लेखापाल यांनी वार्षिक उलाढाल रू. 8,17,58,568/- (अक्षरी रू. आठ कोटी सतरा लाख अठावन्न हजार पाचशे अडुसष्ट मात्र) एवढया रक्कमेचे प्रमाणपत्र प्रमाणित केलेले असावे. |

| सर्व साधारण अटी | |
|---|---|
| 1 | लिलावातील मंजुर देकार रक्कमेवर अधिकचा 18% GST भरणे बंधनकारक राहिल. |
| 2 | मनपाने निश्चित केलेल्या किमान रक्कमेवरती कमीत कमी रु.1,00,000/- च्या वाढीव टप्प्याने बोली वाढवावी लागेल. |
| 3 | निविदाधारकाने दर सादर करताना सर्व करासह दर सादर करावेत. यशस्वी ठेकेदार यांना वस्तु व सेवा कराचा भरणा करणे बंधनकारक आहे. यशस्वी ठेकेदार यांनी करारनामा केल्यानंतर वस्तु व सेवा कर व इतर शासकीय कराचा भरणा करण्यास कसुर केल्यास सदरची रक्कम अनामत रक्कमेमधुन वसुल करण्यात येईल. |
| 4 | ना-फेरीवाला क्षेत्रात कोणत्याही परीस्थितील बाजार फी वसुली करता येणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी. |
| 5 | सध्या ज्याठिकाणी बाजार भरतो ती जागा अन्यत्र बदलण्याचा अधिकार महानगरपालिकेचा असून त्याबाबत यशस्वी निविदाधारक यांना कसलीही तक्रार करता येणार नाही. |

| | |
|---|---|
| 6 | यशस्वी निविदा धारक यांना बाजार फी वसुली सन 2025-26 या आर्थिक वर्षातील रक्कम रु. 12,93,76,195/- या रक्कमेच्या 15% रक्कम रु. 1,94,06,429/- एवढी अनामत रक्कम बिनव्याजी ठेक्याची मुदत पुर्ण होईपर्यंत महानगरपालिकेकडे ठेवावी लागेल. |
| 7 | लिलाव मंजुर स्विकृती पत्र यशस्वी ठेकेदारांनी दिल्यानंतर 15 टक्के अनामत रक्कम 3 दिवसात भरणा करावी लागेल. सदरची सुरक्षा अनामत रक्कम मुदतीत भरणा न केल्यास ठेकेदाराची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. सदर सुरक्षा अनामत रक्कम मागणी धनाकर्षा (Demand Draft) च्या स्वरुपात महापालिकेकडे भरणा करावयाची आहे. |
| 8 | बाजार लिलावाची अंतिम बोली रक्कम एकुण 36 हप्त्यात भरणा करावयाची असुन बाजार लिलावाचा कार्यादेश मिळाल्यांनतर मनपाने ठरवुन दिलेला मासिक हप्ता प्रत्येक महिन्याच्या 1 ते 5 तारखेपर्यंत मनपा फंडात भरणा करावयाचा आहे. बाजार लिलावाच्या रक्कमेचा भरणाबाबतच्या अटीशर्ती करारनाम्यामध्ये नमुद करण्यात येतील. |
| 9 | बाजार फी वसुल करण्याच्या ठेक्याबाबत हप्त्यांची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास 18% दरसाल दर शेकडा व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल. |
| 10 | विभागाचा बाजार फी वसुली ठेका 36 महिने कालावधीसाठी आहे. बाजार फी वसुली करण्याकरीता वापरण्यात येणारी पावती पुस्तके महानगरपालिकेकडुन पुरविण्यात येतील, तसेच प्रत्येक पावतीवर महानगरपालिका शिक्का व दररोजची तारीख असल्याशिवाय बाजार फी वसुली करता येणार नाही. |
| 11 | महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी यशस्वी ठेकेदार यांनी करारनामा करतेवेळीस बाजार लिलावाच्या रक्कमेच्या एकुण 36 हप्त्यातील रक्कमेचे 36 आगाऊ चेक/धनादेश महापालिकेकडे जमा करणे बंधनकारक आहे. सदर आगाऊ चेक महापालिकेकडे मुदतीत जमा न केल्यास ठेकेदार यांची इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. महानगरपालिकेस बाजार फी वसुलीच्या पावत्या तपासण्याचा अधिकार राहिल. |
| 12 | बाजाराचे लिलाव ज्यांच्या नावाने मंजुर होईल, त्यांनेच बाजार फी वसुली केली पाहीजे. दुसरे कोणास उपकंत्राट देता येणार नाही. |
| 13 | यशस्वी निविदाधारक यांनी हप्त्यांची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास किंवा बाजार फी वसुली चे काम करणे थांबविल्यास व्दित्तीय लिलाव करण्याचा महानगरपालिकेला पुर्ण अधिकार राहील. व्दितीय फेर लिलाव केल्यानंतर कमी दराने करारनामा करावा लागल्यास व महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई या प्रथम लिलाव घेणा-याकडुन वसुली केली जाईल. त्याकरिता प्रथम ठेकेदार / अभिकर्ता यांस महापालिकेविरुध्द दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. |
| 14 | बाजारात बसणा-या विक्रेत्याकडून महानगरपालिका नियमानुसार बाजार फी वसुल करावी लागेल. दमदाटीने फी वसुल केल्यास ठेकेदारावर नियमानुसार कारवाई केली जाईल. |
| 15 | बाजारात बसणा-या विक्रेत्याकडुन दिवसाला एक वेळच बाजार फी वसुल करावी लागेल. दिवसातुन दोन वेळा बाजार फी वसुली करता येणार नाही. जागा बदलल्यास वेगळी बाजार फी द्यावी लागेल. दोन वेळेस एकाच जागेवरुन बाजार फी वसुल केल्याची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा महापालिकेच्या निदर्शनास आल्यास त्वरीत कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 16 | महानगरपालिका हद्दीत कोणत्याही ठिकाणी बाजार भरला तरी महानगरपालिका ठरवुन देईल त्या कंत्राटदाराशिवाय इतर कोणासही बाजार फी वसुल करण्याचा अधिकार नाही. |
| 17 | सध्या व पुढे ज्या प्रमाणात जागा राहील व महानगरपालिका दाखविल त्याच जागेवरुन बाजार फी वसुल करावी लागेल. त्यामध्ये महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. |
| 18 | बाजार फी ची वसुली सौजन्याने व सहनशिलतेने करावी लागेल. |
| 19 | यशस्वी निविदाधारक यांना आदिवासी वर्गाकडुन बाजार फी वसुली करता येणार नाही. |
| 20 | जो विभाग पार्किंग म्हणुन घोषित केलेला आहे, तेथील बाजार फी वसुली करु नये. |
| 21 | मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाले/फळ विक्रेते/ मासळी विक्रेते (अधिकृत रजिस्टर) संघटनांची महानगरपालिकाकडे बाजार कंत्राटदार नियमाप्रमाणे पैसे वसुल करत नाही. बाजार पावती प्रमाणे पैसे न घेता जास्त पैसे घेतात अशा स्वरुपाच्या लेखी तक्रारी सतत कार्यालयास प्राप्त झाल्यास वस्तुस्थितीची पाहणी करुन प्रती तक्रारी मागे ठेकेदारास रु.5000/- दंड आकारुन ती रक्कम महानगरपालिका फंडात जमा केली जाईल. |
| 22 | महानगरपालिकेने ठरवुन दिलेल्या बाजार फी प्रमाणे विक्रेत्याकडुन बाजार फी घ्यावी लागेल. महानगरपालिका बाजाराचे ठिकाणी फलकावर फी चे दर प्रसिध्द करेल. त्याप्रमाणे बाजार फी ची मंजुरी ठेकेदारास घ्यावी लागेल. त्यात बदल करता येणार नाही. फलकावर उल्लेख केलेल्या रक्कमे पेक्षा जास्त फी आकारल्यास कंत्राट रद्द केले जाईल व 15% अनामत रक्कम महानगरपालिका फंडात जमा केली जाईल. |
| 23 | प्रशासकिय ठराव क्र. 195 दि. 07-08-20023 अन्वये फेरीवाल्याकडुन बाजार फी निश्चित केलेले दर रु. 75/- यावर अधिकची GST (18%) बाजार फी वसुल करावी. तसेच 2 चौरस मीटर पेक्षा अधिक जागा व्यापली असल्यास रु. 100/- यावर अधिकची GST (18%) या दरानुसार पुढे फेरीवाल्याकडुन बाजार फी वसुल करणे बंधनकारक आहे. |
| 24 | ज्या ठेकेदारास बाजार ठेका मंजुर होईल, त्या ठेकेदाराने नियमानुसार स्वखर्चाने कोणत्याही थकबाकीबाबत मा.न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट नाही. असे नोटरी करणे बंधकारक राहिल |
| 25 | ज्या इसमाकडे महापालिकेची कोणतीही थकबाकी आहे, अशा इसमास लिलावात भाग घेता येणार नाही. थकबाकी नसल्याबाबतचा दाखला मनपा कडुन घेतल्यानंतरच बाजार लिलाव या प्रक्रियेत भाग घेता येईल. |
| 26 | महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमध्ये बसणा-या मासळी/मटण/फळ/भाजी विक्रेत्या कडुन बाजार फी वसुल करता येणार नाही. |
| 27 | महानगरपालिकेने मनाई केलेल्या ठिकाणाहुन बाजार फी वसुल करु नये. |
| 28 | बाजार फी वसुली पोटी दिवसातुन (24 तासात) एकदाच वसुल करावी व महानगरपालिकेने मंजुर केलेल्या दरापेक्षा जास्त रक्कम वसुल करु नये. |
| 29 | कोरी निविदा सादर केल्यास किंवा लिलाव मंजुर झाले नंतर ठेकेदाराने ठेका मागे घेतल्यास फॉर्म सोबत भरलेली इसारा रक्कम महानगरपालिका जप्त करील व ठेकेदारांचे नाव काळया यादीत टाकुन त्याचेवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 30 | ठेकेदारामार्फत बाजार फी वसुली करणा-या कर्मचा-याकडे बाजार फी वसुली बाबतचे ओळखपत्र असावे. ओळखपत्रा शिवाय वसुली केली गेल्यास ठेकेदाराविरुध्द महापालिकेमार्फत कारवाई केली जाईल. |
| 31 | मागील कोरोना कालावधीची परिस्थिती पाहता भविष्यात कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती आल्यास त्या कालावधीतील वसुल करावयाची बाजार फी रक्कमेबाबत संपूर्ण निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त यांना राहिल. |
| 32 | ना फेरीवाला क्षेत्र वगळून बाकी अन्य सर्व ठिकाणी बसणाऱ्या फेरीवाल्याकडुन बाजार फी वसुली करण्यात यावी. |
| 33 | एखादया दिवशी अपरिहार्य कारणास्तव बाजार बंद राहिल्यास त्या दिवशीच्या बाजार हप्त्याच्या रक्कमेत सुट देण्याबाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त सो. यांचा राहील. |
| 34 | पथ विक्रेता संरक्षण कायदा 2014 च्या तरतुदीच्या अधिन राहुन ही निविदा मागविण्यात येत आहे. या कायदयाअंतर्गत पारीत होणारे /झालेले आदेश निर्णय ठेकेदारावर बंधनकारक राहतील. |
| 35 | निविदा स्विकारण्याचा किंवा फेटाळण्याचा अंतिम अधिकार मा. आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे. |
| 36 | ई-ऑक्शन चालु असताना ऑक्शनचा कालावधी वाढविण्याचा अधिकार मा. आयुक्तांना राहील. या बाबतचा तपशील संकेतस्थळावर आपणांस उपलब्ध राहील. |
| 37 | यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेली जाहीर लिलाव सुचनेमध्ये सहभाग नोंदविलेल्या ठेकेदार, व्यवसायधारक, व्यापारी संस्था यांनी एकूण देकार रक्कमेच्या अर्धा टक्के इसारा रक्कम रू. 16,35,171/- (सोळा लाख पसतीस हजार एकशे एकाहत्तर मात्र) RTGS व्दारे मनपाच्या अधिकृत बँक खात्यात भरणा केली असल्यास सदरची पावती (चलन) सोबत जोडण्यात यावे. |

कल्पिता पिंपळे
उप-आयुक्त (बाजार)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

# मिरा भाईदर महानगरपालिका

बाजार विभाग

स्व.इंदीरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज

भाईदर (प). ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र. 28192828

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र.मनपा/ बाजार/29 /2024-25

दि.30 /09/2024

प्रति,

ODS Protective Services Pvt. Ltd.,
D-105/106, कैलाश इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स,
वीर सावरकर मार्ग, विक्रोली (प.), मुंबई 400 079

**विषय :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बाजार फी वसुली करीता अभिकर्ता (एजंट) नेमणूकी बाबत.

**संदर्भ :-**
1. मा. आयुक्त सो. यांचे दि. 19-09-2024 रोजीची मान्यता.
2. मा. प्रशासकी सभा दि. 19-09-2024 प्रकरण क्र. 184 ठराव क्र. 184 अन्वये मंजूरी.
3. धनाकर्ष क्र. 000992 दि. 25-09-2024 रू. 1,94,06,429/- रक्कमेची पावती पुस्तक क्र. 4126 पावती नं. 412549 दि. 26-09-2024 रोजी मनपा फंडात जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम.
4. दि. 27-09-2024 रोजीचा करारनामा.

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपलिका क्षेत्रात **भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) व मुर्धा ते उत्तन या विभागांची एकत्रित बाजार फी वसुली** करीता आपणांस खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात येत आहे

| अ.क्र. | विभाग | कालावधी | मंजूर देकार रक्कम |
|---|---|---|---|
| 1. | भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) व मुर्धा ते उत्तन | 03-10-2024 ते 02-10-2027 | रू. 32,73,34,271/- |

बाजार वसुली संदर्भात खालीलप्रमाणे पुर्तता करण्यात यावी.

1 बाजार बोली लिलावाची रक्कम करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निश्चित केलेल्या किमतीचे 36 समान हप्त्याचे 36 आगाउ धनादेश आदेशाच्या दिनांकारोजी महानगरपालिकेत जमा करावेत.

2 करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार निर्धारीत केलेल्या बाजार फी वसुली मासिक हप्ता रक्कमेवर 18% GST आकारून 36 समान हप्त्याचे 36 आगाउ धनादेश आदेशाच्या दिनांकारोजी महानगरपालिकेत जमा करावेत.

3 करारनाम्यातील नमूद अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

4 बाजार हप्त्याची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास मुद्दल रक्कमेवर 18% द.सा.द.शे. व्याजासह रक्कम वसुल करण्यात येईल.

5 बाजार हप्त्याची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास कोणतीही पुर्वसुचना अथवा नोटीस न देता ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेचा पुर्ण अधिकार राहील. फेर लिलाव केल्यानंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई आपलेकडून (प्रथम लिलाव घेणाऱ्याकडून वसुली केली जाईल) करण्यात येईल.

6 महानगरपालिकेने फेरीवाल्यांकरीता मंडईमध्ये बसण्याची व्यवस्था केल्यास सदर ठिकाणची बाजार फी वसुली करू नये.

## CHALLAN
### MTR Form Number 6

| GRN | MH00081?601202425E | BARCODE | | Date | 26/09/2024 14:42:51 | Form ID |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| **Department** | Inspector General Of Registration | **Payer Details** | |
| | Non-Judicial Stamps Consolidated Stamp Duty | **TAX ID / TAN (If Any)** | MUMD0?87?E |
| **Type of Payment** | Inspector General of Registrations | **PAN No.(If Applicable)** | AAAC?5?75E |
| **Office Name** | THN4_THANE NO 4 JOINT SUB REGISTRAR | **Full Name** | DDS PROTECTIVE SERVICES PRIVATE LIMITED |
| **Location** | THANE | **Flat/Block No.** | Unit no D 105 106 BLDG No 2 Kailash Complex |
| **Year** | 2024-2025 One Time | **Premises/Building** | |

| Account Head Details | Amount In Rs. | | |
|---|---|---|---|
| 0030046401 Consolidated Stamp Duty05 | 328000.00 | **Road/Street** | Veer Savarkar Marg Vikhroli |
| | | **Area/Locality** | MUMBAI |
| | | **Town/City/District** | |
| | | **PIN** | 4 0 0 0 7 9 |
| | | **Remarks (If Any)** | Payment of Stamp Duty for Collection of Market Fees from Hawkers Zone under MBMC |
| | | **Amount In Words** | Three Lakh Twenty Eight Thousand Rupees Only |
| **Total** | 3,28,000.00 | | |

| **Payment Details** | STATE BANK OF INDIA | **FOR USE IN RECEIVING BANK** | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Cheque-DD Details** | | Bank CIN | Ref. No. | 00040572024092672414 | CK00DWXEO7 |
| Cheque/DD No. | | Bank Date | RBI Date | 26/09/2024 14:24:43 | Not Verified with RBI |
| Name of Bank | | Bank Branch | | STATE BANK OF INDIA | |
| Name of Branch | | Scroll No. , Date | | Not Verified with Scroll | |

Department ID : Mobile No. : 80808?278?

NOTE : This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.



Print Date 26-09-2024 02:43:1?

For DDS Protective Services Pvt. Ltd.

Director

(कविता विचके)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# // करारनामा //

आज दि. 27-09-2024 रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका येथे पुढील पक्षांमध्ये भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) व मुर्धा ते उत्तन या चारही विभागाकरीता एकत्रित बाजार फी ठेकेदाराद्वारे वसुल करणेकरीता करारनामा करण्योत येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्यामार्फत श्रीम. कल्पिता पिंपळे, उप-आयुक्त कार्यालयीन पत्ता, स्व इंदिरा गांधी भवन, छात्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) 401101 येथे असुन या पुढील लेखामध्ये याचा उल्लेख "प्रथम पक्षीय" असा केला आहे. यामध्ये हक्कदार इ. चा समावेश होतो.

आणि

मे. ODS Protective Services Pvt. Ltd., D-105/106, कार्यालयीन पत्ता, कैलाश इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, वीर सावरकर मार्ग, विक्रोली (प.), मुंबई 400 079 येथे असुन या पुढील लेखामध्ये याचा उल्लेख "द्वितीय पक्षीय" असा केला आहे. यामध्ये त्यांचे हक्कदार, वारस इ. चा समावेश होतो.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) व मुर्धा ते उत्तन या क्षेत्रातील रस्त्यांवर बसणाऱ्या फेरीवालंकडून बाजार फी वसुल करण्याची व सदरचे काम कोणत्याही अभिकरणाकरवी ती पार पाडण्याची तरतुद आहे.

त्याअर्थी महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) व मुर्धा ते उत्तन या विभागातील फेरीवाला क्षेत्रामधुन बाजार फी वसुली करीता अभिकर्ता नेमणूकीबाबत दि. 10-08-2024 रोजीचा दै. सकाळ, दै. जन खुलासा व दै. कोकण सकाळ या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यांत आली. सदर जाहीर नोटीसीनुसार दि. 04-09-2024 रोजी ई-ऑक्शन लिलाव पध्दतीने वरील चारही विभागातील फेरीवाला क्षेत्रामधुन बाजार फी वसुलीकरीता लिलाव करण्यात आला.

ज्याअर्थी सदर लिलावामध्ये "द्वितीय पक्षीय" यांना रू. 32,73,34,271/- (अक्षरी रूपये बत्तीस कोटी त्र्याहत्तर लाख चौतीस हजार दोनशे एकाहत्तर मात्र )ही लिलावाची अंतिम बाजार वसुली रक्कम मंजूर झालेली आहे. प्रथम पक्षीय यानी "द्वितीय पक्षीय" यांना भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) व मुर्धा ते उत्तन या विभागातील फेरीवाला क्षेत्रामधुन बाजार फी वसुलीचा ठेका उक्त रक्कमेसाठी देण्याचे मान्य करून दि. 23-09-2024 रोजी स्विकृत पत्र देण्यात आले आहे.

For ODS Protective Services Pvt. Ltd.

Director

उपायुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

ज्याअर्थी प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाचा आणि कामाच्या तपशिलाचा विचार करून "द्वितीय पक्षीय" यांनी बाजार फी वसुलीच्या कामाकरीता दिलेल्या संमतीनुसार "द्वितीय पक्षीय" यांना खालील अटीशर्तीस अधिन राहून भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, भाईंदर (प.) ते मुर्धा ते उत्तन या विभागातील फेरीवाला क्षेत्रातील रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्याकडून बाजार फी वसुली करणेसाठी मे. ODS Protective Services Pvt. Ltd.,यांना दि. 03-10-2024 ते 02-10-2027 (36 महिन्यांकरीता) या कालावधीकरीता अभिकर्ता म्हणून नेमण्यासाठी ठरविले आहे. आणि त्यास अनुसरून खालील अटीशर्तीनुसार करारनामा करण्यात येत आहे. त्याप्रमाणे सदर कराराच्या अटी व शर्ती उभय पक्षीय यांना बंधनकारक आहेत.

For ODS Protective Services Pvt. Ltd.

Director

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1 | कार्यादेशमध्ये नमूद केल्याप्रमाणे कराराचा कालावधी काम सुरू झाल्याच्या दिनांकापसुन तीन वर्षाचा असेल. |
| 2 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभेने ठराव क्र. 29 दि. 19-07-2008 रोजी मिरा-भाईंदर क्षेत्रामध्ये फेरीवाला व ना फेरीवाला क्षेत्र घोषित केली आहेत. सदर मंजूर करण्यात आलेल्या फेरीवाले व ना-फेरीवाले क्षेत्राची यादी या कारानाम्यासोबत जाडून Annexure A & B संबोधण्यात येत आहे. |
| 3 | द्वितीय पक्षीय यांनी शेवटच्या वर्षाच्या आर्थिक वर्षातील रक्कम रू. 12,93,76,195/- या रक्कमेच्या 15% रक्कम रू. 1,94,06,429/- ऐवढी सुरक्षा अनामत रक्कम धनाकर्ष क्र. 000992 दि. 25-09-2024 पावती पुस्तक क्र. 4126 पावती नं. 412549 दि. 26-09-2024 अन्वये प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा केली आहे.. |
| 4 | प्रथम पक्षीय यांना सदर ठेका चालु असताना फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राच्या यादीत बदल करण्याचा संपुर्ण अधिकार आहे. याबाबत द्वितीय पक्षीय यांना प्रथम पक्षीय यांच्या विरूध्द कोणताही दावा सांगता येणार नाही. |
| 5 | बाजार फी वसुलीचे काम ज्यांचे नावाने मंजूर होईल, त्यांनाच बाजार फी वसुलीचे काम करणे बंधनकारक आहे. दुसरे कोणास उप-कंत्राट देता येणार नाही किंवा सदरचा ठेका हस्तांतरीत करता येणार नाही. |
| 6 | मा. महासभा दि. 19-07-2008 ठराव क्र. 29 अन्वये घोषित केलेल्या "ना-फेरीवाला क्षेत्र" मध्ये "बाजार फी" ची वसली द्वितीय पक्षीय यांना करता येणार नाही. महानगरपालिकेने ठरविलेल्या ना फेरीवाला क्षेत्रात बाजार फी वसुली करू नये, वसुली केल्याचे प्रथम पक्षीय यांच्या निदर्शनास आढळून आल्यास द्वितीय पक्षीय यांच्या विरूध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल. परंतु मा. स्थायी समिती सभा दि. 14-10-2015 ठराव क्र. 88 अन्वये ना फेरीवाला क्षेत्रात / सार्वजनिक रस्त्यांवर फेरीवाले बसल्यास त्यांचेवर महानगरपालिकेच्या प्रभाग अधिकारी यांच्या नियंत्रणात फेरीवाला पथकाकडून हटविण्याची कारवाई सतत करण्यात येणार आहे. कारवाई होत असतानाही फेरीवाले ना फेरीवाले क्षेत्रात बसल्यास बाजार फी आकारण्यात यावी. |
| 7 | बाजार फी वसुली करता वापरण्यात येणारी पावती पुस्तके प्रथम पक्षीय यांच्याकडून पुरविण्यात येतील. प्रत्येक पावतीवर महानगरपालिकेचा शिक्का, दररोजची तारीख व अनुक्रमांक असल्याशिवाय द्वितीय पक्षीय यांना "बाजार फी" वसूल करता येणार नाही. तसेच प्रथम पक्षीय यांस "बाजार फी" वसुलीच्या पावत्या तपासण्याचा अधिकार राहील. बाजार फी वसुली ठेका संपल्यानंतर द्वितीय पक्षीय यांनी शिल्लक राहिलेले पावती पुस्तके प्रथम पक्षीय यांना परत करावयाचे आहे. किंवा द्वितीय पक्षीय यांनी स्वखर्चाने POS मशीनद्वारे बाजार फी वसुली करावी. |

For ODS Protective Services Pvt. Ltd.

Director

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | |
|---|---|
| 8 | प्रथम पक्षीयच्या मा. प्रशासकीय ठराव क्र. 195 दि. 07-08-2023 अन्वये फेरीवाल्यांकडून एक चौ.मि. पेक्षा अधिक जागा फेरीवाला व्यापत असेल तर त्यासाठी रू. 75/- + 18% GST (रू.14/-) = रू. 89/- बाजार फी वसुल करावी व दोन चौ.मि. पेक्षा अधिक जागा व्यापती असल्यास रू. 100/- + 18% GST (रू.18/-) = रू. 118/- या दराने पुढे फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुली करणे द्वितीय पक्षीय यांस बंधनकारक आहे. प्रथम पक्षीय यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा जास्त बाजार फी वसुली द्वितीय पक्षीय यांना करता येणार नाही. प्रथम पक्षीय बाजाराचे ठिकाणी फलकावर व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर बाजार फी चे दर प्रसिध्द करेल. बाजार फी मंजूर दरानुसारच ठेकेदारास वसुल करावी लागेल. त्यात द्वितीय पक्षीय यांना बदल करता येणार नाही. |
| 9 | प्रथम पक्षीय यांनी ठरवून दिलेल्या मंजूर दरापेक्षा जास्त दराने द्वितीय पक्षीय हे बाजार फी वसुल करीत असल्याबाबतची तक्रार प्रथम पक्षीय यांच्याकडे प्राप्त झाली किंवा बाजार फी वसुली बाबत सतत तीन वेळा तक्रार असल्यास वस्तुस्थितीची पाहणी करून प्रती तक्रार मागे रू. 5000/- प्रमाणे दंड आकारण्यात येवून द्वितीय पक्षीय यांच्याकडून वसुल केली जाईल. |
| 10 | द्वितीय पक्षीय यांना तक्रारीच्या अनुषंगे दंड आकारून देखील उल्लंघन केल्यास तसेच मासिक हप्त्याची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास ठेका रद्द करण्याचा महानगरपालिकेस पुर्ण अधिकार राहील. तद्नंतर फेर लिलाव केल्यानंतर/निविदा मागविल्यानंतर महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई Risk Cost Clause नुसार द्वितीय पक्षीय यांच्या जमा करण्यात आलेल्या अनामत रककमेतुन किंवा त्यांचेकडून वसुल केली जाईल. |
| 11 | बाजारात बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून दिवसाला एका वेळेस बाजार फी वसुली करावी लागेल. सदर विक्रेत्यांकडून दिवसातुन दोन वेळा बाजार फी वसुली करता येणार नाही. परंतु फेरीवाल्याने जागा बदल्यास अशा फेरीवाल्यांना नव्याने बाजार फी दयावी लागेल. |
| 12 | ना फेरीवाला क्षेत्रात / सार्वजनिक रस्त्यांवरील विक्रते/फरीवाले हटविण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील. |
| 13 | द्वितीय पक्षीय यांनी फेरीवाल्यांकडून बाजार फी ची वसुली नियमानुसार, सौजन्याने व संसदीय मार्गाने करावी. फेरीवाले कुठल्याही युनियनचे असले व त्यांच्याकडे युनियनचे कार्ड उपलब्ध असले तरी देखील महानगरपालिकेची दैनंदिन पावती देणे अनिवार्य आहे. तसेच द्वितीय पक्षीय यांनी बाजार फी दमदाटीने वसुली केल्यास ठेकेदारावर नियमानुसार कारवाई केली जाईल. |
| 14 | द्वितीय पक्षीय यांनी आदिवासी वर्गाकडून बाजार फी वसुली करू नये. |
| 15 | द्वितीय पक्षीय यांनी प्रत्येक महिन्यांच्या 1 ते 5 तारखेपर्यंत निश्चित केलेल्या हप्त्याची रक्कम Demand Draft/RTGS स्वरूपात भरणा करावयाचा आहे. सदर रक्कमेचा विहीत मुदतीत भरणा न केल्यास सदर रककमेचा भरणा करेपर्यंत 18% द.सा.द.शे. दराने व्याज आकारण्यात येईल. द्वितीय पक्षीय यांनी त्यांच्या विरूध्द आकारलेल्या व्याज किंवा दंड रक्कमेचा भरणा प्रथम पक्षीय यांच्याकडे मुदतीत न केल्यास, द्वितीय पक्षीय यांनी प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा केलेल्या अनामत रक्कमेतुन सदर दंडाची व व्याजाची रक्कम वसुल करण्यात येईल. |
| 16 | महानगरपालिकेच्या मालकीच्या वास्तुमध्ये बसणाऱ्या अधिकृत भाडेकरू ज्यांच्या जवळ महानगरपालिकेची भाडे पावती आहे, अशा मासळी/मटण/फळ/भाजी विक्रेत्यांकडून बाजार फी द्वितीय पक्षीय यांना वसुल करता येणार नाही. |

For ODS Protective Services Pvt. Ltd.

Director

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | |
|---|---|
| 17 | द्वितीय पक्षीय लिलावाची मंजूर रक्कम रु. 32,73,34,271/- इतकी असुन कार्यादेश मिळाल्यानंतर प्रती महिना निश्चित केलेल्या किंमतीचे 36 समान हप्त्यांचे 36 आगाऊ धनादेश त्या प्रत्येक महिन्याच्या 1 ते 5 दरम्यानची तारीख टाकून प्रथम पक्षीय यांना देण्यात यावेत. द्वितीय पक्षीय यांनी संबंधित महिन्यातील हप्त्याची रक्कम सदर महिन्याच्या 5 तारखेपर्यंत म्हणजेच मुदतीत प्रथम पक्षीयकडे भरणा न केल्यास सदर महिन्यासाठी प्रथम पक्षीय यांच्याकडे आगाऊ जमा केलेले धनादेश प्रथम पक्षीय यांच्या खात्यात जमा करण्यात येईल. |
| 18 | प्रथम पक्षीय यांनी निश्चित केलेल्या हप्त्यांची रक्कम द्वितीय पक्षीय यांनी भरणेस आणि/किंवा हप्ता भरणेस विलंब केल्यामुळे त्यावर आकारण्यात येणारे व्याज भरणेस सतत दोन महिने कसूर केल्यास आणि/किंवा करारनाम्यातील अटीशर्तींचे उल्लंघन केल्यास महानगरपालिकेत जमा केलेली बाजाराची अनामत रक्कम जप्त करून ठेका रद्द करण्याची कारवाई केली जाईल. |
| 19 | बाजार बोली लिलावाच्या मंजूर रक्कमेवर वेळोवेळी निर्धारीत केलेल्या दराने राज्य व केंद्रीय कर भरण्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. (कर भरणा पावतीची नक्कल प्रत या कार्यालयात सादर करावी.) |
| 20 | द्वितीय पक्षीय यांच्या वतीने बाजार फी बाबतचे महानगरपालिकेचे मान्यता प्राप्त ठेकेदाराचे ओळखपत्र असणे बंधनकारक राहील. ओळखपत्राशिवाय वसुली केली गेल्यास कारवाई केली जाईल. |
| 21 | लिलाव मंजूर झाल्यानंतर द्वितीय पक्षीय यांनी मुदतीपूर्वी ठेका मागे घेतल्यास निविदे सोबत भरलेली इसारा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिका जप्त करील व द्वितीय पक्षीय यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल. |
| 22 | सदरचा ठेका यशस्वीरित्या पुर्ण झाल्यास किंवा केंद्र शासनाने लागु केलेल्या पथविक्रेता अधिनियम नुसार कार्यवाही चालु केल्यामुळे सदरचा करारनामा रद्द केल्यापासुन म्हणजेच प्रथम पक्षीय यांना कोणतीही रक्कम येणे शिल्लक नसल्यास किंवा महानगरपालिकेविरध्द कोणताही दावा नसल्यास सदर सुरक्षा अनामत रक्कम द्वितीय पक्षीय यांना बिनव्याजी परत करण्यात येईल. |
| 23 | केंद्र शासनाने पथविक्रेता (उपजिविका सरंक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम 2014 लागू केला आहे. अधिनियमाच्या कलम 36 व 38 मधील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजिविका सरंक्षण व पथविक्री विनियमन नियम 2016 व नियम 2017 तयार केला आहे.) नियम 2016 मधील तरतुदीनुसार मनपाच्या स्तरावर नगर पथविक्रेता समिती गठीत करणेची कार्यवाही सुरू आहे. सदरची कार्यवाही होणेकरीता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे. तरी याबाबतीत करावयाच्या कार्यवाहीच्या अधिन राहून द्वितीय पक्षीय यांना ठेका देण्यात येत आहे. सदर समिती स्थापनेबाबत पथ विक्रेताचे सर्वेक्षण करून नोंदणी करणेबाबत व त्यांना त्यानुसार प्रमाणपत्राबाबत महाराष्ट्र शासनाने किंवा कोणत्याही न्यायालयाने आदेश दिल्यास सदरचा ठेका रद्द समजण्यात येईल. याबाबतची द्वितीय पक्षीय यांना प्रथम पक्षीय यांच्याकडे तक्रार करता किंवा दावा सांगता येणार नाही. |
| 24 | प्रथम पक्षीय यांनी द्वितीय पक्षाशी सल्लामसलत करून उक्त कराराच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. |

For DDS Protective Services Pvt. Ltd.

Director

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | |
|---|---|
| 25 | सदर ठेक्यासंदर्भात हद्द मा. न्यायालय, ठाणे हयांची असेल. |
| 26 | फोर्स मेजर ( Force Majeure)<br>फोर्स मेजर इव्हेंट म्हणजे घटना किंवा परिस्थिती किंवा या खंडात उल्लेख केलेल्या घटना आणि परिस्थितींचे संयोजन जे या करारातील पक्षाच्या किंवा पक्षांच्या वाजवी नियंत्रणाबाहेर आहेत आणि कोणत्या पक्षाने त्याच्या वाजवी वापराने प्रतिबंधित केले नाही किंवा त्यावर मात केली नाही. खाली वर्णन केलेल्या मर्यादेशिवाय, या कराराच्या अनुषंगाने आणि जे निसर्गाचे आहे, त्याच्या दायित्वांच्या कामगिरीच्या संबंधात कौशल्य आणि काळजी:<br>(i) नोंदणीकृत आणि मान्यताप्राप्त संघटनेने जाहीरपणे संप/बंद घोषित केला.<br>(ii) सार्वजनिक आंदोलन, प्रतिकार, अशांतता, जमावबंदी किंवा कोणत्याही प्रकारचे आंदोलन.<br>(iii) नैसर्गिक आपत्ती उदा. पूर, भूकंप, मुसळधार पाऊस, चक्रीवादळ, भूस्खलन इत्यादींचा पक्षांच्या दायित्वांच्या कामगिरीवर भौतिक प्रतिकूल परिणाम होतो.<br>(iv) कोणतीही आपत्ती उदा. फायर ब्रेकआउट, साथीचे रोग, किरणोत्सर्ग, जलविज्ञान आपत्ती, तेल गळती इत्यादींचा पक्षांच्या दायित्वांच्या कामगिरीवर भौतिक प्रतिकूल परिणाम होतो.<br>(v) युद्ध, आक्रमण, सशस्त्र संघर्ष किंवा परकीय शत्रूची कृती, सशस्त्र दलांची अनपेक्षित पाचारण, नाकेबंदी, निर्बंध, क्रांती, दंगल, तोडफोड, दहशतवाद, किंवा अशा धोक्याची कृती किंवा इतर कोणतीही राजकीय किंवा सामाजिक घटना त्यातील पक्षांच्या दायित्वांच्या कामगिरीवर भौतिक प्रतिकूल परिणाम.<br>कंत्राटदाराने अशा घटना घडल्यापासुन 72 तासांच्या आत महनगरपालिकेला नोटीस देवून कळवावे लागेल. कंत्राटदाराला बाधित कालावधीसाठी आणि बाधित क्षेत्रासाठी किंवा त्याच्या काही भागासाठी परवाना शुल्क भरण्यात सूट देवून दिलासा दिला जाईल.<br>याबाबत विभागाने प्रमाणित केल्यानंतर सदर कालावधीतील बाजार फी शुल्क भरण्यात सुट दिली जाईल. |
| 27 | एखादया दिवशी अपरिहार्य कारणास्तव बाजार बंद राहिल्यास त्या दिवशीच्या बाजार हप्त्याच्या रक्कमेत सुट देण्याबाबत अंतिम निर्णय मा. आयुक्त साहेब यांचा राहील. |
| 28 | या करारामुळे कुठल्याही स्वरूपाची मिरा-भाईंदर महानगरपालिकेस क्षती/हानी झाल्यास द्वितीय पक्षीय क्षतिपूर्तीची हमी देत आहे. |
| 29 | द्वितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेले काम मध्येच खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केल्यास द्वितीय पक्षीय यांच्या सोबत केलेला करारनामा रद्द करून द्वितीय पक्षीय यांनी जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार प्रथम पक्षीय यांस राहील. |
| 30 | करारातील अटी व शर्ती मुळे तसेच सदोष कामामुळे वित्तीय व कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी द्वितीय पक्षीय यांची राहील. |
| 31 | महाराष्ट्र मुद्रांक शुल्क कायदा अन्वये योग्य ते मुद्रांक शुल्क (Stamp Duty) रू. 3,28,000/- करारनाम्यासाठी द्वितीय पक्षीय यांनी भरणा केलेली आहे. |
| 32 | सदर ठेक्याच्या संपूर्ण प्रक्रियेत ठेक्यासंदर्भात सादर करण्यांत आलेली सर्व कागदपत्रे दसताऐवज निविदा फॉर्म ही करारनाम्याचा एक भाग समजण्यात येईल. |

मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

For DDS Protective Services Pvt. Ltd.

Director

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | |
|---|---|
| 33 | ठेकेदार यांना मासिक वस्तु व सेवा कराचा भरणा करणे बंधनकारक आहे. ठेकेदार यांनी करारनामा केल्यानंतर वस्तु व सेवा कर व इतर शासकीय कराचा भरणा करण्यास कसूर केल्यास सदरची रक्कम अनामत रक्कमेमधुन वसुल करणेत येईल. |
| 34 | मनपामार्फत बांधा वापरा हस्तांतरीत करा (BOT) या तत्वावर काही ठिकाणी मार्केट विकसित करण्यात आलेले आहेत. तसेच काही ठिकाणी मार्केट बांधण्याची प्रक्रिया सरू आहे. तरी सदर BOT तत्वावरील मार्केट मध्ये रस्त्यावरील व्यवसाय करणारे लाभार्थी यांचा समावेश होणारी संख्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाच्या अनुषंगाने विचारात घेवून विषयांकित कामाकरीता नेमण्यात येणाऱ्या ठेकेदाराची भरावयाच्या बाजार फी हप्त्यात त्यानुसार सवलत देण्यात येईल. त्यामुळे यशस्वी ठेकेदार यांना BOT तत्वावरील मार्केटमध्ये बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करता येणार नाही. ज्या दिनांकास जेवढे फेरीवाले मार्केटमध्ये स्थलांतर होतील, तेवढी रक्कम वार्षिक अतिम मंजूर देयक रक्कमेतून कमी करण्यात येईल, तसेच त्या लाभार्थिकडून बाजार फी वसुल करता येणार नाही. |
| 35 | ठेकेदार यांनी हप्त्यांची रक्कम मुदतीत भरणा न केल्यास किंवा बाजार फी वसुली चे काम करणेस थांबविल्यास द्वितीय लिलाव करण्याचा महानगरपालिकेला पुर्ण अधिकार राहील. द्वितीय लिलाव केल्यानंतर कमी दराने करारनामा करावा लागल्यास व महानगरपालिकेस नुकसान झाल्यास त्याची भरपाई या प्रथम लिलाव घेणाऱ्या ठेकेदाराकडून वसुली केली जाईल. त्याकरीता प्रथम ठेकेदार/अभिकर्ता यांस महानगरपालिके विरूध्द दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. |
| 36 | बाजारात बसणाऱ्या विक्रेत्यांकडून महानगरपालिका नियमानुसार बाजार फी वसुल करावी लागेल. दमदाटीने/वाजवी बाजार फी पेक्षा जास्त/बाजार पावती न देता बाजार फी वसुली केल्यास ठेकेदारावर नियमानुसार कडक कारवाई केली जाईल. |
| 37 | महानगरपालिका हद्दीत कोणत्याही ठिकाणी बाजार भरला तरी महानगरपालिका ठरवुन देईल त्या कंत्राटदाराशिवाय इतर कोणासही बाजार फी वसुल करण्याचा अधिकार नाही. |
| 38 | सध्या व पुढे ज्या प्रमाणात जागा राहील व महानगरपालिका दाखविल त्याच जागेवरून बाजार फी वसुल करावी लागेल. त्यामध्ये महानगरपालिका कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. |
| 39 | बाजार फी ची वसुली सौजन्याने व सहनशिलतेने करावी लागेल. |
| 40 | महानगरपालिकेच्या मालकीच्या मार्केटमध्ये बसणाऱ्या मासळी/मटण/फळ/भाजी विक्रेत्यांकडून बाजार फी वसुली करता येणार नाही. |
| 41 | ठेकेदारामार्फत बाजार फी वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्याकडे बाजार फी वसुली बाबतचे ओळखपत्र असावे. ओळखपत्र शिवाय वसुली केली गेल्यास ठेकेदाराविरूध्द महानगरपालिकेमार्फत कारवाई केली जाईल. |
| 42 | महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचारी हयांना बाजार फी वसुलीच्या पावत्या तपासण्याचा अधिकार राहील. |

For ODS Protective Services Pvt. Ltd

Director

(कल्पिता पिंपळे)
उपायुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | |
|---|---|
| 43 | पथ विक्रता सरंक्षण कायदा 2014 च्या तरतुदीच्या अधिन राहून ही निविदा मागविण्यात येत आहे. या कायदया अंतर्गत पारीत होणारे/झालेले आदेश, निर्णय ठेकेदारावर बंधनकारक राहतील. |

यातील साक्षीत नमूद केलेले पक्षकार व साक्षीदार यांनी या करारात दि. 27 सप्टेंबर 2024 दिवशी समक्ष स्वाक्षरी केली आहे. .

**यातील नमूद केलेले पहिले पक्षकार**

मिरा-भाईंदर महानगरपालिका

यांचे करीता आयुक्त यांनी समक्ष सही केली आहे.

(कविता बोरकर)

उप-आयुक्त (बाजार)

मिरा-भाईंदर महानगरपालिका

साक्षीदार

1) श्री. संतोष रामा इश्कर

लिपीक

मिरा-भाईंदर महानगरपालिका

भ्र.क्र.

साक्षीदार

1) श्री. राकेश काशीनाथ पाटील

संगणक चालक

मिरा-भाईंदर महानगरपालिका

भ्र.क्र.

यातील नमूद केलेले दुसरे पक्षकार

ODS Protective Services Pvt. Ltd.,

D-105/106, कैलाश इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स,

वीर सावरकर मार्ग, विक्रोली (प.), मुंबई 400 079

यांनी समक्ष स्वाक्षरी केली आहे

For ODS Protective Services Pvt. Ltd.

Director

(हिमांशु मिश्रा)

Director

ODS Protective Services Pvt. Ltd.,

साक्षीदार

1) Kuntal Choudhury

VP - Business Development

ODS Protective Services Pvt. Ltd.

भ्र.क्र.

साक्षीदार

1) SWAPNIL NAIR

OFFICE ASSISTANT

ODS PROTECTIVE SERVICES PVT. LTD.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १९/०७/२००८

प्रकरण क्र. २७ :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्राबाबतचे धोरण निश्चित करणे आणि ना-फेरीवाला क्षेत्रातील फेरीवाल्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये काढून टाकणे.

ठराव क्र.२९:-

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये विना परवानगी चालू असलेल्या फेरीवाल्यांना व सार्वजनिक ठिकाणी विक्री करणाऱ्या व्यक्तींना नोटीस न देता काढुन टाकण्याची तरतुद आहे. अशाप्रकारे महानगरपालिका हद्दीत कार्यवाही करणेपूर्वी फेरीवाला क्षेत्र व ना-फेरीवाला क्षेत्र ठरविणे आवश्यक आहे. तसेच शहरातील जनतेच्या अडचणीचा व रहदारीचा विचार करता शहरातील काही भाग हा फेरीवाला मुक्त करणे आवश्यक आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत फेरीवाला, ना-फेरीवाला क्षेत्राचे धोरण ठरवितांना यापूर्वी याबाबत वेळोवेळी झालेल्या मा. स्थायी समिती व मा. महासभेच्या निर्णयाचा तसेच या विषयी स्थापन करण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांच्या व पदाधिकाऱ्यांच्या समितीच्या अहवालाचा विचार करता विभाग निहाय खालीलप्रमाणे फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र करावे.

### १) भाईंदर (पश्चिम) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग (मोदी पटेल नाका ते भाईंदर सेकंडरी स्कुल ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान) | डॉ. आंबेडकर रोड महावीर अपार्टमेंट ते [illegible] पॅलेस रस्त्यापर्यंत. |
| २ | पोलिस स्टेशन भाईंदर रेल्वे फाटक पर्यंतचा रस्ता. | राम मंदीर मार्ग पोलिस स्टेशन ते जैन मंदिर फुटपाथवर बैठकी विक्रेते |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (६० फुट रोड) बावन जिनालय जैन मंदिर ते बनी पॅलेस पर्यंतचा रस्ता. | शास्त्री नगर रस्त्याची डावी बाजू. रेल्वे समोर कमला पार्क व वालचंद कॉम्पलेक्स |
| ४ | बावन जिनालय परिसर. | प्रकाश मार्केट ते जोशी निकेतन रस्त्याची बाजू. रस्त्यावर खाद्यपदार्थ विक्रेते [illegible] बिल्डींगपर्यंत. |
| ५ | जे. एच. पोद्दार हायस्कूल रोड. | चर्च ते महानगरपालिका कार्यालय (जुने बाजार ते मोती नगर) |
| ६ | महाराजा अग्रसेन मार्ग. | भाईंदर (प.) येथे आठवडयाच्या बाजार वरील दिलेल्या रस्त्यांवर फेरीवाले बसवता [illegible] परवानगी देण्यांत येत आहे. |
| ७ | जयप्रकाश नारायण मार्ग. | सदासत्य अपार्टमेंट ते अमृतवाणी [illegible] रस्त्याच्या डाव्या बाजूस. |
| ८ | स्टेशन रोड ते बालाजी वसाहत ते रेल्वे पादचारी पुल, विनायक मंदीर मार्ग. | |
| ९ | भाईंदर स्टेशन ते पोलीस चौकी. | |
| १० | जनता नगरकडे जाणारा रस्ता. | |
| ११ | राममंदीर रोड | |
| १२ | मोदी पटेल रोड | |
| १३ | जैन मंदीरच्या बाजूने देवचंद नगरकडे जाणाऱ्या दोन्ही गल्ली. | |

सत्य प्रत

नगर सचिव

| | | |
|---|---|---|
| १४ | ९० फुट रोड, रजिस्ट्रेशन ऑफिस समोरचा रस्ता | |

## २) भाईंदर (पूर्व) विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | प्रशांत हॉटेल ते गोडदेव नाका ते गोडदेव उद्यान सभोवताली (बी. पी. रोड) | भाजी मार्केट खारीगांव |
| २ | गोडदेव नाका ते नवघर नाका, गोडदेव तलाव परिसर, गोडदेव नाका ते अभिनव नाका नवघर फाटक रोड दोन्ही बाजू. | नवघर गावाजवळ इंदीरा नगरकडे (कृणाल कुटीर ते नवघर स्मशान रस्त्याची उजवी बाजू). |
| ३ | बंदरवाडी नाका ते कृणाल कुटीर नवघर रोड. (नवघर नाका) | नवघर गावाकडे जाणारा रस्ता. |
| ४ | बंदरवाडी नाका ते हॉटेल प्रशांत (रेल्वे समांतर रस्ता) | इंद्रवरुण हॉल ते रेल्वे समांतर खाडी पर्यंत |
| ५ | साई बाबा मंदीर ते गोडदेव नाका (गोडदेव फाटक रोड) | आर. एन. पी. पार्क चिंतामणी अपार्टमेंट. |
| ६ | बंदरवाडी नाका ते जेसल पार्क जैन मंदीर पर्यंत. | परब मसाले ते साधुराम हॉटेल. |
| ७ | भाईंदर (पूर्व) फाटक चर्च ते केबीन रोड | नर्मदा कुंज (रावल नगर) ते सुलभ शौचालय उजवी बाजू. |
| ८ | पानटेकडी रोड (शिर्डी नगर रोड ते गोडदेव स्मशान भूमी रोड) | राम गोपाल बिल्डींग ते शितल अपार्ट. रस्त्याची उजवी बाजू. |
| ९ | केबिन रोड नाका ते नर्मदा नगर मधून एम. आय. उद्योग नगर पासून अभिनव स्कूल नाका पर्यंत जाणारा रस्ता. | हनुमान नगर एक बाजू. |
| १० | नवघर क्रॉस रोड. | |
| ११ | भाईंदर (पूर्व) विजय पंजाब ते खारीगांव सत्यनारायण मंदीर ते रामगोपाल सदन केबीन रोड पर्यंत. | |
| १२ | इंद्रवरुण हॉल ते जैन मंदिराची एक बाजू. (जेसल पार्ककडे जाणारा एक रस्ता) | |
| १३ | खारी तलाव रोड | |
| १४ | बंदरवाडी नाका ते जैन मंदीर डीवाईन शेल्टर/ कपूर टॉवर पर्यंत. | |
| १५ | के. दत्तु म्हात्रे मार्ग (न्यु गोल्डन नेस्ट १०० फुटी रोड) | |
| १६ | दिपक हॉस्पीटल मार्ग. | |
| १७ | हनुमान मंदिर ते एस.एन. कॉलेज. | |
| १८ | राहूल पार्क ते आर.एन.पी. पार्क. | |
| १९ | जागृती अपार्टमेंट ते रावल नगर ते नर्मदा कुंज. | |
| २० | नवघर क्रॉस रोड (एस.व्ही. रोड) | |
| २१ | नारायण मार्बल ते आयुक्तांच्या बंगल्या रस्ता | |
| २२ | धनेश हॉटेल ते तलाव रोड ते गांवदेवी मंदिर परिसर. | |
| २३ | साईबाब नगर किरण नाला (नवघर क्रॉस रोड) | |

## ३) मिरारोड विभाग

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | भाईंदर (पू.) फाटक ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळया पर्यंत. | नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग समोर फक्त |
| २ | शांतीनगर संकुलनाचे प्रवेशद्वार ते एस.के. स्टोन पर्यंतचा रस्ता. | नरेंद्र पार्क इ-५ बिल्डींग ते मेघदुत बिल्डींग पर्यंत |
| ३ | मिरारोड स्टेशन पासून नयानगरकडे जाणारा रस्ता. | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. २ व १० मधील बाजू. सेक्टर-२ च्या बाजूची. |
| ४ | पोस्ट ऑफीस राजधानी अपार्ट. ते नाल्यापर्यतचा रस्ता. | नया नगर रोहित बिल्डींग ते सिता पार्क गेट एक बाजू. |
| ५ | मेडतीया नगर / चंद्रेश निकेतन बिल्डींग लोढा कॉम्प्लेक्स ते कुरनाल शॉपींग सेंटर आणि उलफत | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. ३ आणि ४ मधील एक बाजू. सेक्टर-३ च्या बाजूची. |

सत्य प्रत
नगर ...
मिरा भाईंदर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| | मंझील पर्यंत. | |
| ६ | शांतीनगर सेक्टर ११ पाण्याची टाकी ते सृष्टीकडे जाणारा रस्ता. | पुजा नगर समोर [illegible] गल्ली एक बाजू. |
| ७ | मिरा रोड स्टेशन शांतीनगर गेट ते शितल नगर नाकापर्यंत | शांतीनगर सेक्टर-६ [illegible] फेस-२ मधील एक बाजू सेक्टर-६ च्या एक बाजू |
| ८ | मिरारोड स्टेशन नयानगर रिक्षास्टॅंड ते शितल नगर नाकापर्यंत | नीदा पार्क ते [illegible] बिल्डींग पर्यंत एक बाजू. |
| ९ | पोस्ट ऑफीस मिरा रोड ते शांतीनगर सेक्टर क्र. १ ते ४ मधील दोन्ही बाजू | सेक्टर नं. ५ सी-३८ [illegible] ते बी-२६-२७ [illegible] बाजू. |
| १० | शांती नगर सेक्टर क्र. ३ ते ६ मधून सृष्टीकडे जाणारा रस्ता दोन्ही बाजू. | |
| ११ | शितल नगर नाका ते जांगीड कॉम्प्लेक्स दोन्ही बाजू. ते सिल्वर पार्क सिग्नलपर्यंत दोन्ही बाजू. | |
| १२ | सेक्टर नं. ६, बी-१ ते अे-७ पर्यंत एक बाजू. | |
| १३ | शांतीनगर सेक्टर नं. १ व २ मधील रस्ता | |
| १४ | शांतीनगर सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| १५ | मिरारोड पूर्व पुनम सागर कॉम्प्लेक्स मधील अंतर्गत रस्ता | |
| १६ | गणपती मार्बल ते रामदेव पार्क पर्यंतचा रस्ता. | |
| १७ | शांतीनगर सेक्टर नं. ३ व ४ मधील रस्ता | |
| १८ | सृष्टी सेक्टर नं. ५ व ३ मधील रस्ता | |
| १९ | सृष्टी सेक्टर नं. २ व ३ मधील रस्ता | |
| २० | रॉयल गार्डन हॉटेल ते सिल्वर पार्क सिग्नल पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला. | |
| २१ | मिरारोड पूर्व नरेंद्र पार्क ज्युपीटर बिल्डींग शेवटच्या दुकानापासून ते अस्मिता हिनटेज पर्यंत दोन्ही बाजू. | |
| २२ | नयानगर हैदरी मस्जिद ते संघवी एम्पायर पर्यंत. | |
| २३ | मिरारोड पूर्व नयानगर मिरा नर्सिंग होम गल्ली झुबेदा बिल्डींग ते ऑचीड बिल्डींग पर्यंत दोन्ही बाजू. | |

### ४) काशीमिरा, मिरा गावठण व इतर हायवे लगत क्षेत्र

| अ.क्र. | ना-फेरीवाला क्षेत्र | फेरीवाला क्षेत्र |
|---|---|---|
| १ | मिरा गावाच्या हायवे लगतचा रोड. | मिरागाव टॅक्स ऑफिस पासून ते पटेल प्लाझा इमारती पर्यंत. |
| २ | मिरा गावाकडे जाणारा रस्ता. | |
| ३ | निलकमल ते लिबर्टी तबेल्यापर्यंत जाणारा रस्ता ते गांवदेवी मंदिर मार्ग. | |
| ४ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८. (दाहेसर चेकनाका ते वर्सोवा नाका) | |
| ५ | छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापसून ते उड्डाण पुलापर्यंत मिरा भाईंदर मुख्य रस्ता व फाटक पर्यंत. | |

मिरा भाईदर महानगरपालिका हद्दीतील ३० फुट व त्यापेक्षा रुंद असणारे सर्व रस्ते ना फेरिवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात यावा.

वरील प्रमाणे महानगरपालिका हद्दीत फेरीवाला व ना-फेरीवाला क्षेत्र निश्चित करणेत आले आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३१ अन्वये ना-फेरीवाला क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यांस मनाई असल्याने ना-फेरीवाला क्षेत्रातील बसणाऱ्या फेरीवाल्यांना त्याठीकाणाहुन काढून टाकण्यांत यावे. अशा [illegible] साहित्य, सामान त्यांना परत न करता त्यांच्यावर दंडात्मक कायदेशीर कारवाई

सत्य प्रत

मिरा रोड व चेणा विभागातील मिरा रोड येथे भरणारा आठवडी सोमवार बाजार व उड्डाण पुलाखाली भरणारा आठवडी शनिवार बाजार यामुळे रहदारीस व वाहतुकीस अडचण व होणाऱ्या चोऱ्या, वाढणारे प्रदूषण यामुळे या बाजारा विषयी नागरीक मध्ये प्रचंड असंतोष आहे. तेव्हा ते दोन्ही बाजार तात्काळ बंद करावेत.

भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरारोड व चेणा विभागाकरीता लिलाव पद्धतीने बाजार फी वसुली मक्ता देण्यांत आला आहे. मक्ता देताना ज्या अटी-शर्ती ठरविण्यांत आल्या आहेत. त्या अटी-शर्ती नुसार भागात फेरीवाल्यांना बसण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. त्या व्यतीरीक्त अन्य सर्व ना फेरीवाला क्षेत्र सार्वजनिक रस्त्यावर बसणाऱ्या फेरीवाल्यांकडून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कराराचा भंग केला म्हणून दंडात्मक कायदेशीर कारवाई करावी.

महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठीकाणी फेरीवाला क्षेत्र घोषित करण्यांत आले आहे. त्या क्षेत्रात मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या निर्णयाच्या अधिन राहून फेरीवाला क्षेत्रासाठी प्रशासनाने कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- श्री. लक्ष्मण गणपत जंगम अनुमोदक :- श्री. राजेश शंकर वेतोस्कर

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे**

**भाईंदर (प.) विभाग**

**फेरिवाला क्षेत्र**

(१) बाबासाहेब आंबेडकर मार्ग, महावीर अपार्टमेन्ट ते (सालासर) विनायक पॅलेस बिल्डींग पर्यंतचा रस्ता

(२) रेल्वे फाटक समोरील रस्त्यावर कमला पार्क व वॉलचंद कॉम्प्लेक्स पर्यंत.

(३) या शिवाय सर्व भाग ना फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावेत.

**ना फेरिवाला क्षेत्र**

(१) भाईंदर (प.) विनायक पॅलेस जैन मंदिरच्या बाजूने देवचंदनगरकडे जाण्याच्या दोन्ही गल्ल्या.

(२) चर्च ते महानगरपालिका (जुने) हे दोन्ही ना फेरीवाला क्षेत्रामध्ये समाविष्ट करावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. वंदना चक्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

प्रभाग क्र. ७१ विजयपार्क ते शिवपुजा बिल्डींग व पंजाब नॅशनल बँक या रस्त्यावर फेरीवाला क्षेत्र नमुद करावे ही विनंती

सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. अनिता जयवंत पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.

दहिसर चेक नाक्यावरुन पेणकरपाड्याकडे जाणारा रस्ता (सागर हॉटेल ते बॉम्बे बॉटल कंपनी पर्यंतचा रस्ता फेरीवाला झोन करण्यात यावा.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. ज्योत्स्ना हसनाळे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रामध्ये गावदेवी मंदिर मार्ग (जरीमरी तलाव रोड, काशिमिरा) नमुद करण्यात यावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. शरद पाटील यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

नर्मदा कुंज (रावलनगर) ते सुलभ शौचालय येथे बसवू नये.

**सदर ठरात सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांनी मांडलेली सूचना खालीलप्रमाणे.**

सदर ठरावात ना फेरीवाला क्षेत्रात नमुद नसलेल्या रस्त्याच्या एकतर्फी फेरीवाले बसवावे. राममंदिर भाईंदर (प.) येथे फेरीवाले हटवून नाझरेथ चर्चच्या बाजूने मोतीनगर येथे जाणारा रस्ता फेरीवाले बसवणे फेरीवाला क्षेत्रात बसणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात येवू नये. तसेच शिवार गार्डन पासून पुढे सरदार वल्लभभाय शाळेकडे जाणाऱ्या शिवार गार्डनच्या लागून असलेल्या बाजूस फेरीवाले बसवणे. तसेच १ महिन्या अगोदर बाजार लिलावाचा ठेका दिला आहे. त्यात या जागा, रस्ता यांचा समाविष्ट करावा अशी सुचना मी मांडत आहे. ती मंजुर करुन घ्यावी. संबंधीत प्रकरणे मा. महासभा, स्थायी समिति सभाचे ठराव व्यपगत करावे मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांचे वेळोवेळी दिलेल्या न्यायालयीन निर्बंधाचे पाळण करावे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा-भाईंदर महानगरपालिका

सत्य प्रत
नगर सचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका